कार्यालयशिक्षण विभाग(प्राथ.)प.स.भातकुलीपरीसर,जिल्हापरिषद,अमरावती

Emai ID – eozpamravati@gmail.com Office Phone No.- 0721-2970206

जा.क्र. /जिपअ/शिक्षण/आस्था/डी-२/६६-२६/२०२४ दिनांक :- १२/ ०८ /२०२४

# जाहिरात

## अमरावती जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळामधील शिक्षकांची अनुसुचित जमाती प्रवर्गातील रिक्त पदे भरणे बाबत

**संदर्भ :-** १. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्रमांक संकीर्ण २०२४/प्र.क्र. ४१४/टिएनटि-१ दि. १५/०७/२०२४

२. मा. आयुक्त (शिक्षण) आयुक्तालय पुणे यांचे पत्र आस्था/प्राथ १०६/शा.प.-पेसा कं.पद/२०२४/४४८१ दि. १९/०७/२०२४

संदर्भीय शासन पत्रानुसार पेसा क्षेत्रातील रिक्त पदे असलेल्या शाळामध्ये नियमित शिक्षकांची भरती होईपर्यत विद्यार्थ्यांचे शैक्षणीक नुकसान होऊ नये या करीता स्थानिक पातळीवर शिक्षक पदासाठी पात्रता धारण करणारे खालील प्रमाणे इच्छुक उमेदवारांना **तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देणेबाबत**

१. शासना मार्फ़त नियमित शिक्षकांची नियुक्ती होईपर्यत विद्यार्थ्यांचे शैक्षणीक नुकसान होऊ नये, या करीता सेवानिवृत्त शिक्षक उपलब्ध न झाल्यास शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमता चाचणी २०२२ नुसार पेसा क्षेत्रातील शिफ़ारस पात्र १५४४ उमेदवारांना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शिक्षण सेवक म्हणुन नियुक्ती देण्यापुर्वी तात्पुरत्या कालावधीकरीता मानधन तत्वावर शिक्षक पदासाठी पात्रता धारण करणारे पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेतील कागपत्र पडताळणी अंती पात्र ठरणा-या उमेदवारांचे कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देणेसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

**उपरोक्त जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे इच्छुक उमेदवाराचे अर्ज दि. १६/०८/२०२४ पर्यत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. अमरावती या कार्यालयाच्या टपालामध्ये (आवक/जावक) सादर करण्यात यावेत. विस्तृत जाहिरात अर्जाचे नमुने व इतर प्रारुप www.zpamravati.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. विहित मुदतीनंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जामधुन पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या अधिकृत वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल**

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद अमरावती**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, अमरावती**

Scanned with OKEN Scanner